(६७)

(१०)

उमा- १९९-२०० (२)

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२**
**अंतर्गत उद्‌भवणाऱ्या शंकांचे निरसन/स्पष्टीकरण.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्र.ममाअ-२००४/प्र.क्र.६६/०४/५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२.६.२००४

**परिपत्रक :-**

शासनाचा कारभार पारदर्शक असावा व शासनाच्या कारभाराची जनतेला जास्तीत जास्त माहिती मिळावी या हेतुने शासनाने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ पारित केलेला आहे. सदर अधिनियमातील तरतुदींमध्ये काही संदिग्धता असल्याबाबत अनेक स्तरावरुन शासनाकडे तक्रारी करण्यात येत होत्या. मा.लोकआयुक्त/ उप लोकआयुक्त यांनीसुध्दा शासनाकडे काही मुद्यांबाबत खुलासा करण्याची विनंती केली होती. वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील संदिग्धते संदर्भात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

| क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | द्वितीय अपीलीय प्राधिकारी म्हणून मा.लोकआयुक्त व यथाशक्ती मा.उप लोकआयुक्त यांनी दिलेला निर्णय बंधनकारक आहे काय? | मा.लोकआयुक्त वा यथास्थिती मा.उप लोकआयुक्त यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ संदर्भात द्वितीय अपीलीय प्राधिकारी म्हणून दिलेले निर्णय हे संबंधितांवर बंधनकारक व अंतिम ठरतात आणि त्यांचे यथोचित पालन करणे आवश्यक आहे. |
| २. | महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ कशा प्रकारच्या सार्वजनिक संस्थांना लागू आहे. | अधिनियमातील कलम २(६) मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या संस्थांना शासनाकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही सहाय्य देण्यात येते, त्यांना हा कायदा लागू असून त्या संस्थांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्या संस्थांनी शासकीय माहिती अधिकारी / अपीलीय प्राधिकारी नेमणे आवश्यक आहे. सदर संस्थांशिवाय ज्या संस्था धर्मादाय आयुक्त/निबंधक यांचेकडे नोंदणीकृत आहेत अशा संस्थांना स्वतंत्रपणे शासकीय माहिती अधिकारी / अपीलीय प्राधिकारी यांच्या नेमणूका करण्याची आवश्यकता नाही. अशा संस्थांसंबंधीची माहिती (जी धर्मादाय आयुक्तांच्या / निबंधकांच्या कार्यालयात उपलब्ध असते ती ) धर्मादाय आयुक्त / निबंधक यांनी त्यांच्या कार्यालयाकरीता नियुक्त केलेल्या शासकीय माहिती अधिकारी / अपीलीय प्राधिकारी यांच्याकडून मिळविता येते. |
| ३. | शासकीय माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्यामध्ये केलेल्या कसुरीबद्दल त्याला मदत करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्याला दंडाची शिक्षा करता येते काय? | "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२" च्या कलम २(७) मध्ये शासकीय माहिती अधिकाऱ्यांची व्याख्या देण्यात आली आहे. त्यानुसार या अधिनियमाखाली आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय माहिती अधिकाऱ्याकडून ज्याचे सहाय्य घेतले जाते अशा अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यासुध्दा शासकीय माहिती अधिकारी समजण्यात येते. ही तरतूद लक्षात घेता, शासकीय माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्यामध्ये केलेल्या कसुरीबद्दल त्याला मदत करणारा अधिकारी/कर्मचारी ज्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास दिरंगाई/विलंब केला असेल तो शिक्षेस पात्र राहील. |

| | | |
|---|---|---|
| ४. | कोणत्याही शासकीय माहिती अधिकाऱ्याने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्यास कोणत्याही योग्य कारणाशिवाय कसूर केली असेल किंवा चुकीची, दिशाभूल करणारी सदोष किंवा अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्यास संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्यावर शास्ती लादता येईल. अशी तरतूद अधिनियमातील कलम १२ मध्ये करण्यात आलेली आहे. त्यामध्ये कसूरवार अधिकाऱ्यावर शास्ती लादण्याची कार्यवाही ही संबंधित सक्षम अधिकाऱ्याच्या स्वेच्छा निर्णयानुसार आहे काय ? | कोणत्याही शासकीय माहिती अधिकाऱ्याने विहित मुदतीत कोणतेही योग्य कारण नसताना माहिती उपलब्ध करुन देण्यात कसूर केली असेल किंवा चुकीची दिशाभूल करणारी सदोष किंवा अपूर्ण माहिती दिली आहे या निर्णयापर्यंत जर सक्षम प्राधिकारी आला असेल तर अशा शासकीय माहिती अधिकाऱ्यावर शास्ती लादणे ही बाब अधिनियमातील कलम १२ मधील तरतुदींनुसार स्वेच्छानिर्णयाधीन नसून ती बंधनकारक आहे. इंग्रजी भाषांतरामध्ये या बाबत जरी "May" असा शब्द वापरण्यात आला असला तरी वस्तुतः तो "Shall" याच अर्थाने वापरण्यात आला आहे. |

"महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२" ची अंमलबजावणी करतेवेळी उपरोक्त बाबींसंदर्भात दिलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन संबंधितांनी योग्य ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-
(यु.पी.एस.मदान)
शासनाचे सचिव

---

क्र.एमजीआर/४८७० दि. २१.०८.२००४.
सही /-
(जॉनी जोसेफ)
ग.न.पा.आयुक्त

क्र.सीपीए/१४७४ दि. २४.०८.२००४.
सर्वांना विदीत करावे.
सही /-
( ए.जी.हिरे )
उप आयुक्त (सा.प्र.)

क्र.एमओएम/४३७३ दि. ०८.०९.२००४.

प्रत : ———————————— यांना माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

रचना व कार्यपध्दती अधिकारी
(ग.न.पा.आयुक्तांचे कार्यालय )

प्रमुख कर्मचारी अधिकारी (प्र.)

C:\MOM\GovtCirInfor.doc User4